# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१९/०७/२०१६.

## १) अज्ञात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे,इसमाचा मृत्यु. :–

दिनांक १७/०७/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील मृतक–रमेश खुशाल सिंगनजुडे वय ४० वर्ष, रा. कोलारी हा एनएच ६ रोडने पायी भंडारा वरून कोलारी कडे जात असता यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन जखमीस भिलेवाडा शिवार येथे धडक दिली व गंभिर जखमी केले. त्यास उपचारास सा. रू. भंडारा येथे भरती केले. असता उपचारा दरम्यान मरण पावला. फिर्यादी मोरेश्वर खुशाल सिंगनजुडे यांचे तोंडी व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

## २) कारने सायकल चालकाला धडक दिल्याने एकाचा मृत्यु . :–

दिनांक १८/०७/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील मृतक लोभाचंद भोवते वय ४५ वर्ष रा. माडगी हा एनएच ६ रोडवरुन सायकल चालक गावाकडे जात असता यातील आरोपी होंडा सिटी कार चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन मृतकचे सायकलला एनएच ६ रोड कोकनागड शिवार येथे मागेहुन धडक दिली. त्यात सायकल चालकाचा जागीच मृतकचे मरणास कारणीभुत झाला. असे फिर्यादी सतिश लोभाचंद भोवते वय ३८ वर्ष यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४ (अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहे.

## ३) ट्रकची मोटार सायकलला धडक दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/०७/०१६ रोजी ८.२० वा. दर. फिर्यादी राजु जानराव देशमुख वय ४१ वर्ष, रा. सहकार नगर भंडारा यांचे मित्र जखमी सुरेश सोमाजी तिडके हा त्याचे टिव्हीएस स्कुटी क्र. एमएच ३६/पी ०७४० ने जेल रोडने पाण्याच्या टाकी जवळुन शितला माता मंदीर कडे जात असता विरुध्द दिशेने येणा–या आरोपी ट्रक चालक याने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मित्राचे स्कुटीला धडक मारुन गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाटसे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) अवैध दारू अडयांवर धाडी. :–

दिनांक १९/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, मोहाडी, व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४ लिटर लिटर हातभट्टी दारू कि. १२००/रु. व १६० मिली. लिटर देशी दारु. कि. ६००/रु. तसेच असा एकुण कि. १,८०० /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.